**MMRDA’s a Strategic move: Removes 84 Kilometers of Barricades From Mumbai Metro Project, Easing Traffic Congestion**

**MUMBAI, 29 June 2023** - The Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has taken a significant step to alleviate road traffic congestion during the monsoon season. Under the directive of Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner of MMRDA, unnecessary barricades have been removed from all ongoing Metro Projects across the Mumbai Metropolitan Region. This decision aims to provide substantial relief to the citizens by ensuring smoother commuting experiences during the monsoon period. A total of 33,922 barricades have been removed, resulting in the clearance of 84.806 kilometers (42 km one-way) of two-way road, opening up more space for traffic.

Currently implementing a 337-kilometer long metro network throughout the Mumbai Metropolitan Region, MMRDA has installed a total of 152.86 kilometers of barricades across several metro lines, including 2B, 4, 4A, 5, 6, 7A, and 9. Notably, MMRDA has successfully removed approximately 60 percent of these barricades, with a total of 84.8 kilometers cleared for traffic.

To ensure smooth traffic flow and minimal disruption for citizens, barricades have been removed from key locations such as Eastern Express Highway (EEH), Western Express Highway (WEH), Bandra Kurla Complex (BKC), S. V. Road, V.N. Purv Marg (Chembur Naka), New Link Road, Gulmohar Road, MG Road, Ghodbunder Road, Kapur Bawadi, Balkum, Dahisar, Mira Road, Bhayander, Thane, Tin Hat Naka, JVLR, Infinity Mall, Powai, Kanjur Marg, and Mankhurd along the under-construction Metro lines. This strategic step has cleared one lane on both sides of the project for traffic, thereby minimizing disturbance to citizens.

Recognizing that barricades are necessary for citizen safety during construction projects, MMRDA has taken measures to install them in a way that occupies minimal space on the road. As a result, wider roads of over 8 kilometers in length are now available at specific locations, ensuring smoother traffic flow. This restructuring effort involved modifying a total of 3,352 barricades.

In addition, MMRDA has implemented various measures to enhance the daily routine for citizens during the monsoon season. These measures include actively addressing road-related issues such as filling potholes, installing motor pumps in waterlogging-prone areas for efficient drainage, and establishing a 24x7 emergency control room for prompt resolution of citizen complaints. These initiatives strive to provide hassle-free commuting and improve living conditions for residents of the Mumbai Metropolitan Region during the monsoon period.

Dr Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA, stated, **”We are committed to minimizing inconvenience to citizens during the monsoon season and have implemented measures to address road-related issues and ensure smooth traffic flow. Our team has successfully removed over 33 thousand barricades within a month, and we will continue to review the project and barricades every 15 days. These initiatives aim to enhance the overall experience of citizens and mitigate disruptions caused by the monsoon."**

**Highlights of Major Traffic Freed Stretch in Several Metro Lines:**
**Metro Line 2B:**
- S.V. Road (Milan Subway Junction to Bandra) - 2.54 km
- Diamond Garden to BARC flyover - 1.408 km
- Gulmohar Road (Juhu Circle to Mithibhai College) - 1.767km
- S.V. Road (Vile Parle Junction to Milan Subway) - 1.057 km
-BKC Road ( Kalanagar to MTNL) -1.536
- Sion- Panvel Highway (BARC FLYOVER to Mankhurd flyover)- 1.459km

**Metro Line 4 & 4A:**
- 90 Feet road - 3.990 km
- Ghodbunder road - 4 km
- Eastern Express Highway
(EEH) 4.726 km
- LBS road - 15 km
-Depot Road 1.154km

**Metro Line 5:**
- Kapurbawdi to Balkum - 1.553 km
- Balkumnaka To Anjurphata - 7.573 km
- Anjur Phata to Dhamankar Naka - 2.033 km

**Metro Line 6:**
- JVLR (WEH junction to Mahakali caves) - 4.30 km
- JVLR (Mahakali Caves to Powai Lake) - 4.19 km
- JVLR (Powai Lake- Vikhroli - Kanjur Marg Depot on EEH) - 6.5 km

**Metro Line 9:**- After Ovaripada Junction to Dahisar toll - 1.648 km
- Dahisar toll to delta junction - 1.710 km

**निर्माणाधीन मेट्रो प्रकल्पासाठी व्यापलेला 84 किमी लांबीचा रस्ता वाहतूकीसाठी केला खुला**

**मान्सुनच्या पार्श्वभूमीवर 33 हजारहून अधिक बॅरिकेड्स हटवण्यात आले**

**मेट्रो प्रकल्पाच्या दुतर्फा असेलेले सुमारे 60 टक्के बॅरिकेड्स एमएमआरडीएने काढले**

**रस्त्याच्या दुतर्फा 1-1 मार्गिका वाहतूकीसाठी खुली**

**मुंबई, 29 जून,, 2023:**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्सून दरम्यान रस्त्यावरील वाहतूककोंडी कमी करून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर रिजन) निर्माणाधीन मेट्रो प्रकल्पातील उन्नत मार्गाचं काम जिथे जिथे झालं आहे तेथील बॅरिकेड्स काढण्याचा निर्णय घेतला आहे. ६ मेट्रो प्रकल्पातील एकुण ३३, ९२२ बॅरिकेडस काढल्याने दुतर्फा ८४.८०६ (४२ किमी एकेरी रस्ता) किमी. लांबीचा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा झाला आहे. मुंबई महानगर प्रदेशात सुमारे ३३७ किमी लांब मेट्रोचं जाळं प्राधिकरणामार्फत उभारण्यात येत आहे. त्यापैकी मेट्रो मार्ग २ब, ४, ४अ, ५,६, ७अ आणि ९ या मेट्रो मार्गासाठी लावण्यात आलेल्या बॅरिकेड्स पैकी सुमारे ६० टक्के बॅरिकेड्स हटवण्यात आले आहेत. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा प्रत्येकी १-१ मार्गिका वाहतूकीसाठी उपलब्ध झाली आहे.

कोणत्याही निर्माणाधीन प्रकल्पात नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एका विशिष्ट रुंदीचा भाग बॅरीकेड्स (धातुच्या पत्र्याचे अडथळे) लावून प्रतिबंधित केला जातो. पण तो प्रकल्प पुर्ण होईपर्यंत रस्ता अडवला जात असल्याने अनेकदा नागरीकांना मोठ्यावाहतुक कोंडीला सामोरं जावं जागतं. त्यावर उपाय म्हणुन प्राधिकरणाने हा निर्णय घेतला आहे. तसचे काही ठिकाणी बॅरिकेड्स ठेवणं अपरिहार्य होतं तिथे ते रस्त्याची कमीत कमी जागा व्यापतील अशा पद्धतीने लावण्याचा निर्णय घेतला गेला. ज्यामुळे अशा ठिकाणी ८ किमीहून लांबीचा अधिक रुंद  रस्ता उपलब्ध झाला आहे. एकुण ३३५२ बॅरिकेड्स अशा पद्धतीने कमी कमी जागा व्यापतील असे पुनर्रचना करण्यात आले.

महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा. प्र.से. यांनी मुंबई महानगर प्रदेशात प्रगतीपथावर असलेल्या सर्व मेट्रो प्रकल्पातील काम पूर्ण झालेल्या ठिकाणच बॅरिकेड्स काढून रस्ते पूर्वस्थितीत खुले करण्याचे निर्देश त्यानंतर अनेक महत्वाच्या रस्त्याचा भाग मोकळा झाल्यानं मान्सून दरम्यान नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पूर्व आणि पश्चिम द्रुतगती मार्ग, बीकेसी, . एस. व्हि.रोड, वी.एन. पुरव

मार्ग(चेंबूर नाका),न्यू लिंक रोड, गुलमोहर रोड, , एम जी रोड, घोडबंदर रोड, कापूरबावडी, बाळकुम, दहिसर, मिरारोड, भाईंदर, ठाणे, तीन हात नाका, जेव्हिएलआर, इन्फिनिटी मॉल, पवई, कांजूरमार्ग, मानखुर्द या भागातील प्रगतीपथावर असलेल्या मेट्रो मार्गांवरील हे बॅरिकेड्स काढण्यात आले आहेत. ज्यामुळे प्रकल्पाच्या दोन्ही बाजूची १- १ मार्गिका वाहतूकीसाठी मोकळी करून नागरिकांना अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे.

**बॅरिकेड्स हटवण्यात आलेल्या काही रस्त्यांचा तपशील**

**मेट्रो मार्ग २ब**

गुलमोहर रोड (जुहू सर्कल ते मिठीबाई महाविद्यालय) १.७६७ किमी

एस.व्ही. रोड (विले पार्ले जंक्शन ते मिलन सबवे) १.०५७ किमी

बी.के.सी रोड (कलानगर ते MTNL) १.५३६ किमी

वि.एन. पूर्व मार्ग (डायमंड गार्डन ते BARC फ्लायओव्हर) १.४०८ किमी

सायन- पनवेल हायवे BARC फ्लायओव्हर ते मानखुर्द फ्लायओव्हर) १.४५९ किमी

**मेट्रो मार्ग ४आणि ४अ**

९० फिट रोड ३.९९० किमी

एल.बी. एस मार्ग (वेगवेगळ्या तीन ठिकाणी) १५ किमी

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे ४.७२६ किमी

घोडबंदर रोड (वेगवेगळ्या दोन ठिकाणी) ४किमी

डेपो रोड १.१५४किमी

**मेट्रो मार्ग ५**

कापूरबावडी ते बाळकुम नाका १.५५३ किमी

बाळकुम नाका ते अंजूरफाटा ७.५७३ किमी

अंजूरफाटा ते धामणकर नाका २.०३३ किमी

**मेट्रो मार्ग ६**

JVLR (WEH जंक्शन ते महाकाली लेणी) ४.३० किमी

JVLR (महाकाली लेणी ते पवई तलाव) ४.१९किमी

JVLR (पवई तलाव- विक्रोळी - EEH वर कांजूर मार्ग डेपो) ६.५ किमी

**मेट्रो मार्ग ९**

ओवारीपाडा जंक्शन ते दहिसर टोल १.६४८ किमी

दहिसर टोल ते डेल्टा १.७१० किमी

मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांना पावसाळ्यात त्रास होणार नाही याची सर्वतोपरी काळजी प्राधिकारणामार्फत घेतली जात आहे. विशेषत: एमएमआरडीएच्या अखत्यारित येणाऱ्या रस्त्यावरील खड्डे भरण्यात येत आहेत, पावसाळ्यात पाणी साचेल अशा जागा आधीच लक्षात घेऊन तिथे मोटर पंप लावण्यात आले आहेत, म्हणजे अतिवृष्टीमुळे साचलेले पाणी पंपाद्वारे उपसा करून त्याचा योग्य निचरा करता येईल. त्यासोबतच नागरीकांनी प्राधिकरणाच्या २४ तास आपत्कालीन नियंत्रण कक्षास संपर्क साधून केलेल्या तक्रारीचे निवारण तात्काळ करण्याच्या सूचना सर्व विभागांना महानगर आयुक्तांनी दिल्या आहेत.

"देशाची आर्थिक राजधानी मुंबईत मोठ्या प्रमाणावर विकासकामं सुरु आहेत. बांधकामा दरम्यान मुंबईकरांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून प्रकल्पाच्या ठिकाणी विशिष्ट जागा बॅरिकेड्स ने प्रतिबंधित करावी लागते.ज्यामुळे रस्त्याचा काही भाग हा प्रकल्प होईपर्यंत मुंबईकरांना वापरता येत नाही. म्हणूनच मुंबई मेट्रो प्रकल्पातील ज्या ज्या टप्प्यातील कामं झाली आहेत अशा ठिकाणचे अडथळे काढुन तो रस्ता मुंबईकरांसाठी खुला करण्यात आला आहे.अवघ्या महिन्याभरात प्राधिकरण्याच्या कर्मचाऱ्यानी ३० हजाराहून अधिक बॅरिकेड्स काढले आहेत. दर १५ दिवसांनी मेट्रोच्या कामाचा आणि बॅरिकेड्सचा आढावा घेतला जाईल.आणि एखाद्या ठिकाणी काम संपलं की लगेचच तो रस्ता वाहतुकीसाठी खुला करुन दिला जाईल.  तसेच रस्त्यांलगतचे सर्व बॅरिकेड्स (barricades) कमीत कमी जागेत लावून जास्तीत जास्त रस्ता रहदारी साठी मोकळा ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत" अशी माहिती एमएमआरडीएचे महानगर आयुक्त, डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे यांनी दिली"


P-02
DRIVER FOR RENT
DAILY & MONTHLY BASIS
DRIVER SERVICE
9930 022 022
27-Jun-2023 1:03:45 pm
Western Express Highway
Andheri East
Mumbai
Konkan Division
Maharashtra


27-Jun-2023 12:59:15 pm
Vile Parle
Mumbai
Konkan Division
Maharashtra